## संक्षीप्त फौजदारी खटला क्र. ४९८/२०२४ वरील नि.क्र. १४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज फिर्यादमध्ये फिर्यादी संस्थेच्यावतीने अधिकृत व्यक्ती यांच्या नावामध्ये बदल करुन दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. फिर्यादी यांचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, प्रस्तुतची फिर्याद आरोपीविरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रमेंट कायदा कलम १३८ प्रमाणे दाखल केली आहे. सदरची फिर्याद संस्थेचे लिपीक श्री. उमेश विठठल दगडे यांच्यामार्फत दाखल केली होती. परंतु सदर संस्थेचे लिपीक श्री. उमेश विठठल दगडे हे आजारी असल्यामुळे सदरचे काम पाहण्यासाठीचे अधिकार श्री. गोविंद राम टिंगरे यांना देण्यात आले आहेत. त्यामुळे सदरची फिर्यादमध्ये दुरुस्त करणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. फिर्यादमधील टायटलमध्ये श्री. उमेश विठठल दगडे यांच्या नावाच्या ठिकाणी श्री.गोविंद राम टिंगरे असे नांव नमूद करण्यास परवानगी असावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

०३. अर्ज व अभीलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. फिर्यादी पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा खटला हा निगोशिएबल इन्स्टुमेंट कायदयाचे कलम १३८ अन्वये दाखल केलेला आहे. फिर्यादी हे एक कायदेशिर व्यक्ती आहेत. त्यामुळे त्यांच्यावतीने काम चालविण्यासाठी अधिकृत व्यक्तीची नियुक्ती करणे आवश्यक आहे. फिर्यादीच्यावतीने अधिकृत व्यक्ती जर काम चालविण्यास सक्षम नसेल तर अधिकृत व्यक्ती बदलण्याचा संपूर्ण अधिकार फिर्यादी संस्थेला आहे.

०४. प्रस्तुत अर्ज व त्यासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की फिर्यादी संस्थेने फिर्यादमधील सरनामेत व परिच्छेद कलम १ मध्ये श्री. उमेश विठठल दगडे यांचे नांवास काट देउन त्याठिकाणी श्री. गोविंद राम टिंगरे' यांचे नांव नमूद करण्यास परवानगी मागितली आहे. वास्तविक सरनामेत दुरुस्ती

मागताना नवीन नियुक्ती केलेल्या लिपीकाचे नावाबरोबरच त्यांचे वय, व्यवसाय, राहण्याचे ठिकाण याचाही उल्लेख असणे आवश्यक आहे. नुसतेच नावात बदल करुन दुरुस्ती मागणे ही अपुरी दुरुस्ती ठरु शकते. सदरच्या अपु–या दुरुस्तीमुळे संपूर्ण खटल्यावर विरुध्द परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव उपरोक्त अपु–या दुरुस्तीमुळे फिर्यादी यांना त्यांच्या विनंतीप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी देणे न्यायोचित ठरत नाही. सबब खालील आदेश पारीत करण्यात येत आहे–

**आ दे श**

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. फिर्यादी यांनी परिपूर्ण दुरुस्ती अर्ज करुन प्रस्तावित दुरुस्तीची मागणी करावी.

KADAM NUTAN SACHIN

Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2026.03.07 14:15:34 +0530

कवठेमहांकाळ

दि.०७.०३.२०२६

(श्रीमती एन.एस.कदम )
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कवठेमहांकाळ

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | - H.P.Haridas |
| Court | - CJJD and JMFC, Kavathemahankal. |
| Date | -07.3.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | -07.3.2026 |
| Order uploaded on | 07.3.2026 |

## Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 3.11.2022
Order signed by the
Presiding Officer on -3.11.2022
Order uploaded on -3.11.2022